# विद्यार्थीनीची छेड काढणाऱ्या शिक्षकाच्या वाहनाची तोडफोड

## शाळेवर धडकले संतप्त गावकरी | स्वत:ला कोंडून घेत शिक्षकाने वाचविला जीव










### अतिरिक्त पोलीस बंदोबस्त लावला

गेल्या 25 नोव्हेंबर रोजी या शिक्षकाकडून या विद्यार्थीनीची छेड काढण्यात आली. परंतू शाळेच्या मुख्याध्यापकांच्या घरी लग्न समारोह असल्याने त्या विद्यार्थीनीच्या पालकांनी आज हा प्रकार मुख्याध्यापकांना सांगून पोलिसात तक्रार दिली. त्यानंतर गावकरी आक्रमक झाले, त्यांनी शाळा परिसरात दगडफेक केली. पोलिसांनी दक्षता म्हणून आरोपी शिक्षकाला अंजनगाव पोलीस स्टेशनमध्ये हलविले आहे. तर शिंदी गावात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे.

### शिंदी गावातील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**शिंदी, ( दि.3 )** - अचलपूर तालुक्यातील शिंदी.बु येथील एका शिक्षकाने इयत्ता 9 वीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीची छेड काढल्याच्या प्रकारानंतर आक्रमक गावकऱ्यांनी आपला रोष व्यक्त करित शाळेवर धडक दिली. यावेळी सदर शिक्षकाने स्वतऱ्ला एका खोलीत कोंडून घेत स्वतऱ्चा जीव वाचविला. परंतू गावकऱ्यांनी शिक्षकासह दोन चारचाकी वाहनाची प्रचंड तोडफोड केली. त्यानंतर गावकऱ्यांनी पथ्रोट पोलीस स्टेशनवर धडक देत या लंपट शिक्षकाला अटक करण्याची मागणी उचलून धरली.

शिंदी गावात एक खासगी संस्थेची शाळा आहे. या शाळेमध्ये असलेला शिक्षक संदीप पाचपोर याने येथील इयत्ता 9 वी मध्ये शिकत असलेल्या एका विद्यार्थीनीची छेड काढली. विद्यार्थीनीने हा प्रकार घरी आपल्या आई-वडिलांना सांगितला, त्यामुळे संतप्त पालक व गावाकऱ्यांनी मोठ्या संख्येत शाळेवर धडक दिली. लोकांची गर्दी पाहून सदर छेड काढणाऱ्या शिक्षकांने स्वत:ला एका वर्ग खोलीत बंद करून घेतले. गावाकऱ्यांनी त्या शिक्षकांची चारचाकी गाडी फोडलीच तसेच तेथे आलेल्या त्याच्या नातेवाईकाच्याही वाहनाची तोडफोड गावकऱ्यांकडून करण्यात आली. लोकांचा जमाव वाढत असल्याचे पाहून शाळा प्रशासनाने पथ्रोट पोलिसांना पाचारण केले. अखेर त्या शिक्षकाला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले.



# आदीवासी विद्यार्थ्यांची पैदल धारणीकडे कूच

## आपल्या विविध मागण्यांकरिता रात्रीच काढला मोर्चा




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.3 )** - मेळघाटमधून अमरावतीमध्ये विविध शिक्षण घेण्याकरिता राहत असलेले आदीवासी युवक-युवती आदीवासी हॉस्टेलमधील दुर्व्यवस्थेसह आपल्या विविध संवैधानिक मागण्यांकरिता मंगळवारी (दि.3) रात्रीच अमरावतीहून धारणी पैदल कूच केली आहे. दरम्यान कुठलीही अप्रिय घटना टाळण्याकरिता जिल्हा व पोलीस प्रशासनाकडून त्या युवक-युवतींना थांबविण्याचा प्रयत्न केला जात होता.

काँग्रेसचे पदाधिकारी मन्ना दारसिंबे यांनी समाजमाध्यमांवर एक पोस्ट करत अमरावती शहरात शिकत असलेले मेळघाटातील शेकडो युवक-युवती अमरावतीहून धारणीकरिता पैदल निघाले आहे. ते आदीवासी प्रकल्प कार्यालयावर आपला मोर्चा घेवून जात आहे. आम्ही या युवकांच्या आंदोलनाचे समर्थन करित असून बुधवारी या आंदोलनात सामील होणार असल्याचेही दारसिंबे यांनी सांगितले. या पुर्वीही अनेकवेळा आदीवासी विद्यार्थ्यांना आपल्या हक्कांकरिता आंदोलन करावे लागले.

# एस-5 कोचचे एक्सल व्हील झाले होते जाम

## ■ धामणगावात अडकली अहमदाबाद-हावडा एक्सप्रेस
## ■ पॉइंटमन सचिनच्या सतर्कतेमुळे टळला अपघात

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे, ( दि.3 )-** अहमदाबाद-हावडा( 12833 ) एक्सप्रेसच्या एस-5 कोचचे एक्सल व्हील जाम झाल्यामुळे ती धामणगाव रेल्वे स्थानकावर थांबवण्यात आली. बोगी वेगळी करण्यात आल्यावर तब्बल तिन तासाने ट्रेन पुन्हा रवाना करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी 3 डिसेंबर रोजी दुपारी 3.45 वाजता धामणगाव रेल्वे स्थानकावर आलेल्या अहमदाबाद-हावडा एक्स्प्रेसच्या एस-5 बोगीच्या चाकाचे एक्सल जाम असल्याचे निदर्शनास आले. हा प्रकार लक्षात येताच दिपोरीचे पॉईंटमन सचिन यांनी तातडीने ही माहिती वरिष्ठांना दिली. त्यानंतर तत्काळ अहमदाबाद-हावडा एक्स्प्रेस धामणगाव स्थानकावर थांबवून वर्धा येथून तांत्रिक विभागाच्या पथकाला पाचारण करण्यात आले. तपासाअंती रेल्वेच्या एस-5 कोचचे चाक नीट काम करत नसल्याचे आणि बेअरिंगमध्ये बिघाड झाल्याचे समोर आले. सुमारे 2 तासांच्या प्रयत्नानंतर हा डबा रेल्वेपासून वेगळा करून त्यात बसलेल्या प्रवाशांना अन्य डब्यांमध्ये हलवण्यात आले.त्या प्रवाशांना नागपुरात अतिरिक्त डबे लावून त्यांची नियोजीत जागा दिली जाणार आहे. वृत्त लिहेपर्यंत अहमदाबाद हावडा एक्स्प्रेस सुमारे तीन तास उशिराने हावड्याकडे रवाना झाल्याची माहिती प्राप्त झाली होती.



### प्रवाश्यांकडून पॉइंटमनचे कौतुक

अहमदाबादहून हावडाला जाणारी ही लांब पल्ल्याची गाडी नेहमी प्रमाणे आपल्या मार्गाने जात होती. दरम्यान एस-5 कोचच्या चाकातील आवाज पॉइंटमन सचिन यांच्या लक्षात आला. काहीतरी बिघाड झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी तत्काळ वरिष्ठांना याबाबत माहिती दिली. त्यांनतर वेळीच खबरदारी घेऊन ट्रेन थांबविल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. सचिनच्या या कामाचे ट्रेनमध्ये बसलेल्या प्रवाशांसह सर्वांनी कौतुक केले.

### गेल्या आठवड्यात झाला होता ट्रॅक फॅक्चर

गेल्या आठवड्यात 28 नोव्हेंबर रोजी धामणगाव रेल्वेपासून दीड किमी अंतरावर रेल्वे रुळ-ट्रॅक फॅक्चर झाला होता. मात्र ट्रॅकमनच्या सतर्कतेमुळे त्यावेळीही मोठी दुर्घटना टळली होती. ट्रॅकमन भोलाराम मिना यांनी सुमारे 400 मीटर धावून मार्गावरून येणारी ट्रेन थांबवून हजारो प्रवाशांचे प्राण वाचवले होते.

# तिवसा, धामणगाव, चांदूर रेल्वे पं.स.वर 15 पासून प्रशासकराज

## निवडणुका लांबणीवर : सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकांचा ताबा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 3 )** -धामणगाव तालुक्यासाठी चांदूर रेल्वे व तिवसा तालुक्याचे विभाजन करण्यात आले. तेव्हापासून या तिन्ही तालुक्यांत पंचायत समित्यांच्या निवडणुका इतर पंचायत समित्यांसोबत न होता स्वतंत्रपणे होत आहेत. या तीनही पंचायत समित्यांचा कार्यकाळ 14 डिसेंबरला संपुष्टात येत आहे. अद्याप प्रभागरचना, आरक्षण सोडत न झाल्याने या पंचायत समित्यांवर डिसेंबरपासून 15 प्रशासकाची नियुक्ती होणार आहे.

विद्यमान बीडीओ हेच पंचायत समितीचे प्रशासक राहणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. जिल्हा परिषदेचा कार्यकाल 20 मार्च 2022 पासून संपुष्टात आलेला आहे, तर चिखलदरा, चांदूर बाजार, मोर्शी, वरुड, अमरावती अचलपूर, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, भातकुली व नांदगाव पंचायत समितीचा कार्यकाळही 13 मार्च 2022 पासून संपुष्टात आला आहे. तेथेदेखील प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणाचे मुद्द्यावर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे या पं. स.ची प्रभागरचना व आरक्षण प्रक्रिया आटोपली असतानाही आयोगाद्वारे निवडणूक कार्यक्रम लावण्यात आला नाही. परिणामी जिल्हा परिषदेसह 11 पंचायत समिती, मनपा व सर्व नगर परिषद व नगरपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. उर्वरित तीन पंचायत समित्यांमध्ये लोकनियुक्त पदाधिकारी होते. आता या ठिकाणीदेखील प्रशासकराज राहणार आहे. तिवसा, चांदूर रेल्वे व धामणगाव रेल्वे पंचायत समितीची मुदत 14 डिसेंबर 2024 रोजी संपुष्टात येत आहे. या पार्श्वभूमीवर तीन महिन्यांपूर्वी प्रभागरचना व आरक्षण सोडतीचा कार्यक्रम व्हायला पाहिजे होता. मात्र या तिन्ही तालुक्यांत आयोगाद्वारे ही प्रक्रिया करण्यात आलेली नाही. त्यामुळे या पंचायत समित्यांच्या निवडणुका न होता प्रशासकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेची सदस्यसंख्या 59 वरून 66 पर्यंत करण्यात आल्याने पंचायत समितीची सदस्यसंख्या 118 वरून 132 झालेली आहे. आता लवकरच निर्णय होऊन न्यायालयीन प्रकरण निकाली निघण्याची शक्यता आहे. त्यामुळे जि.प. व सर्व पंचायत समिती व काही दिवसांच्या फरकात नगर परिषद, नगरपंचायत व मनपाची निवडणूक होण्याची शक्यता असल्याची चर्चा प्रशासनात आहे.






### या तारखेपासून प्रशासकराज

- जिल्हा परिषद : 20 मार्च 2022 10
- पंचायत समिती : 13 मार्च 2022
- धारणी पंचायत समिती : 24 जून 2022
- तिवसा, चांदूर, धामणगाव : 14 डिसेंबर 2024

# पावसाळी ढगांमुळं थंडी गायब

## थंडीचा कडाका कमी होणार | खर्चात वाढ, पिकाचे भवितव्य अंधारात





**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट( दि.3 )** - सध्या थंडीचा कडाका लक्षणीयरित्या कमी झाल्याचं पाहायला मिळत आहे. डिसेंबर महिन्यात सुरुवातीला थंडीचा आणखी जोर धरणं अपेक्षित होता. तिथं अचानक ही थंडी दडी मारताना दिसत आहे. या हवामान बदलानं सर्वांचीच चिंता वाढवली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या फेंगल चक्रीवादळामुळं ही प्रणाली पूर्णपणे बदलली असून, हिवाळ्याच्या दिवसांमध्ये राज्यावर पावसाचे ढग घोंगावताना दिसत आहेत.

पुढील 24 तासांमध्ये राज्याच्या बहुतांश भागांमध्ये हवामानाची स्थिती स्थिर राहणार. कोकण किनारपट्टी क्षेत्रावर दमट हवामानात वाढ होणार असून, काही भागांवर पावसाळी ढगांचं सावट पाहायला मिळणार आहे. दरम्यानच्या काळात बंगालच्या उपसागरावरून वाहणारे हे वारे अरबी समुद्राच्या दिशेनं जाताना त्यांची तीव्रता आणखी कमी होऊन त्यानंतरच राज्यातील हवामानात सुधारणा अपेक्षित असल्याचं सांगण्यात येत आहे.

### थंडीचा कडाका कमी होणार

सहसा डिसेंबर महिन्यापासून देशभरात थंडीचा कडाका वाढतो. पण, यंदा मात्र परिस्थिती काही वेगळी असल्याचं पाहायला मिळत आहे. आयएमडीच्या वृत्तानुसार डिसेंबर महिन्यात अपेक्षित तापमान घट नोंदवली जाणार असून, एकंदरच हिवाळ्यादरम्यान म्हणजे डिसेंबर ते फेब्रुवारीच्या काळात अपेक्षित प्रमाणात शीतलहरी निर्माण होणार नसल्यामुळं यंदाची थंडी बेताचीच असेल. समाधानकारक हिवाळ्या साठी थंडी महत्त्वाची असणारी अल निना प्रणाली सतत हुलकावणी देत असल्याने आता ही प्रणाली सक्रीय केव्हा होते याकडेच हवामान विभागाचं लक्ष लागलं आहे. देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये थंडीचा जोर काही अंशी कमी झाल्यामुळं याचा परिणाम आणि तिथून चक्रीवादळाचा परिणाम या साऱ्यामुळं महाराष्ट्रातील किमान तापमानात वाढ होत असल्याची बाब निदर्शनास येत आहे. ढगाळ वातावरणाचा प्रतिकूल परिणाम पिकांवर होत आहे. यामुळे फुलगळती, अळीचा प्रादुर्भाव, मर रोग एवढेच नाही तर पिकांची वाढच खुंटते यामुळे शेतकरी त्रस्त आहे. खरिपापाठोपाठ आता रब्बी हंगामाचे भवितव्य काय राहणार या चिंतेत जिल्ह्यातील शेतकरी आहेत.

### खर्चात वाढ, पिकाचे भवितव्य अंधारात

गेल्या आठ दिवसांपासून वातावरणात नेहमी बदल झालेला आहे. सकाळ-संध्याकाळ थंडी तर दिवसभर ऊन असे पोषक वातावरण असताना आता दिवसभर ढगाळ वातावरण आणि सकाळ-संध्याकाळ थंडीचा जोर वाढलेला आहे. त्यामुळे गहू, हरभरा, कांदा या पिकांवर मर रोगाचा प्रादुर्भाव वाढणार. तुर हरभरा यावर अळी वाढल्या. तुर, कापुस, हरभरासह भाजीपाला यावर अळीसून सरंक्षण करण्यात शेतकऱ्यांच्या खर्चामध्ये वाढ होणार आहे. एकीकडे उत्पादनात घट होत असताना वाढत असलेला खर्च ही चिंतेची बाब आहे. यापूर्वी खरीप हंगामातील पिकांचे नुकसान हे अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे झाले तर आता ढगाळ वातावरणाचा धोका रब्बी हंगामातील पिकांवर कायम आहे.

# पोलिस व्हॅन च्या धडकेत युवक गंभीर



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.3 )-** येथील नवीन बस स्थानक परिसरातील अग्रसेन चौकातील दर्यापूर कडे जाणाऱ्या मार्गावर पोलीस व्हॅनची धडक लागल्याने दुचाकीस्वार युवक जखमी झाला. ही घटना मंगळवारी रात्री 8.30 वाजताच्या सुमारास घडली.

एमएच 27 / एए 5146 या क्रमांकाची पोलीस व्हॅन घटनेच्यावेळी दर्यापूरकडे जात होती.दरम्यान भैय्यालाल पटेल (वय 20 रा. बरडी शिंगरोली मध्यप्रदेश) हा युवक आपली दुचाकी घेवून या व्हॅनवर धडकला. पोलीसांनी त्याला तातडीने येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचाराकरिता नेले. डॉक्टरांनी त्याला अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालय रेफर केले असून त्याची स्थिती अत्यंत गंभीर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# ई पीक पाहणी : तलाठ्यांकडून कासवगती!

## शेतकऱ्यांना मदत मिळण्यास अडचणी | भावांतर योजना : कपाशी, सोयाबीनचे अनुदान केव्हा?

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.3 )-** ई-पीक पाहणी केलेल्या शेतकऱ्यांना गतवर्षीच्या कपाशी व सोयाबीनसाठी दोन हेक्टर मर्यादेत हेक्टरी पाच हजारांची मदत देण्यात आलेली आहे. यामध्ये अनेक शेतकऱ्यांची नावे या यादीत नसल्याने त्यांनाही योजनेचा लाभ मिळावा यासाठी ज्यांच्या सात-बाऱ्यावर या पिकांची नोंद आहे. अशा शेतकऱ्यांच्या याद्या तलाठीवर्गाकडून मागविण्यात आल्या. तलाठी वर्गाकडून प्रक्रीयेत कासवगती दिसत आहे. तलाठ्यांकडून प्रत्यक्षात सप्टेंबर महिन्यापासून या याद्या कृषी विभागाला अप्राप्त असल्याने शासनाला प्रस्ताव गेला नसल्याचे वास्तव आहे.




गतवर्षी पावसाअभावी कपाशी व सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले व हमीभावही शेतकऱ्यांना मिळाला नसल्याने उत्पादन खर्चही निघालेला नाही. त्यामुळे या खातेदारांना दोन हेक्टर मर्यादेत प्रतिहेक्टरी पाच हजारांची मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. यामध्ये ज्या खातेदारांनी ई पीक पाहणी केली असेल त्यांनाच मदत देण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले व त्याच शेतकऱ्यांना शासन अनुदानाचा लाभ विधानसभा निवडणुकीपूर्वी देण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील चार लाख शेतकऱ्यांना त्यांच्या पेऱ्यानुसार शासन मदत मिळण्याची शक्यता आहे.

### योजनेची जिल्हा स्थिती

| | |
|---|---|
| ई-केवायसी झालेले शेतकरी | - 2,17,815 |
| कपाशीचा पेरा असलेले शेतकरी | - 1,06,302 |
| सोयाबीनचा पेरा शेतकरी | - 1,48,477 |

आदिवासी शेतकऱ्यांना वनपट्टे वितरित आहे. अशा वनपट्टेधारकांपैकी कपाशी किंवा सोयाबीन अथवा दोन्ही पिकांची लागवड केली होती. याची गावनिहाय यादी संकलित करण्यात येऊन जिल्हा स्तरावरून ही यादी कृषी विभागाला देण्यात येणार आहे व याची पोर्टलवर माहिती कृषी विभागाद्वारा अपलोड करण्यात येणार असली तरी माहिती अद्याप अप्राप्त आहे. ज्या शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी केली व त्यांची नावे यादीत नाहीत. मात्र, त्यांच्या सात-बारावर पिकांची नोंद आहे, अशा शेतकऱ्यांना याबाबत स्थानिक तलाठी यांच्याकडे नोंद करावी लागेल व त्यानंतर पडताळणी करून संबंधित तलाठी यांच्याद्वारा याद्या कृषी विभागाला देण्यात येणार आहेत. प्रत्यक्षात अशा याद्या कृषी विभागाकडे अप्राप्त आहेत.

# गाडगेबाबा यात्रेनिमित्त जड वाहतुकीस प्रतिबंध करा!

## शिवसेना उपमहानगर प्रमुख विजय ठाकरे यांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )-** श्री संत गाडगेबाब पुण्यतिथी महोत्सवानिमीत्त सुरु होणाऱ्या यात्रा दरम्यान पंचवटी ते शेगाव नाका पर्यंत जड वाहतुकीला प्रतिबंध घालण्याची मागणी शिवसेना उपमहानगर प्रमुख विजय ठाकरे यांनी केली आहे.

राष्ट्रसंत, वैराग्यमूर्ती श्री संत गाडगेबाबा यांच्या 68 व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त संत गाडगेबाबा नगरीत 14 ते 21 डिसेंबर 2024 पर्यंत भागवत सप्ताह, किर्तन व यात्रा मोठ्या प्रमाणात भरते यात्रेदरम्यान आजूबाजूच्या जिल्ह्यातील आणि ग्रामीण भागातील भाविक आणि नागरिक यांची मोठ्या प्रमाणात येथे गर्दी राहते, म्हणून पंचवटी (डॉ.पंजाबराव देशमुख चौक) ते शेगाव नाका पर्यंत जड वाहनास(एसटी बस, ट्रॅव्हल्स, रेतीचे ट्रक, गिट्टी बोल्डर चे ट्रक) व अन्य जड वाहतुकीसाठी प्रतिबंध, मनाई करण्याची मागणी विजय ठाकरे शिवसेना उपमहानगर प्रमुख यांनी केली आहे.कारण गाडगेबाबा नगर मधून जाणारा मार्ग राज्य महामार्ग असल्याने तसेच संपूर्ण शासकीय कार्यालय व कॉलेजेस या मार्गावर असल्यामुळे खूप वर्दळ राहते त्यामुळे मोठे अपघात होण्याची शक्यता टाळता येत नाही एखादा अपघात झाल्यास आणि जीवित हानी झाल्यास यात्रेला गालबोट लागू नये म्हणून या रस्त्यावरील जड वाहतूक पूर्णपणे बंद करून ती वाहतूक वळवून बाबा रेस्टॉरंट ते लेखूमल चौक ते शेगाव नाका अशी करावी किंवा संपूर्ण वाहतूक रिंग रोडवर वळवण्यात यावी अशी विनंती ही विजय ठाकरे यांनी पोलीस प्रशासनाला निवेदनाद्वारे केली आहे. अन्यथा यात्रेदरम्यान या रोडवर अपघात किंवा जीवित हानी झाल्यास शिवसेनेच्या वतीने उग्र आंदोलन करून रस्त्याच्या मधोमध बसून चक्काजाम आंदोलन करण्यात येईल व याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील असा इशारा ही शिवसेना उपमहानगरप्रमुख विजय ठाकरे यांनी दिला आहे.



# भाजीपाला घेऊन जाणारे वाहन उलटले

## सुदैवाने जीवीतहानी टळली


## मार्गावरील मेंढ्यामुळे अपघात



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.3 ) -** अकोला ते परतवाडा राज्य महामार्गावरील सातेगाव फाट्यानजीक भाजीपाला वाहुन नेणारे व कॅरेट ने भरलेले मालवाहू वाहन पलटी झाल्याची घटना आज सकाळी 8 वाजताच्या सुमारास झाली. मिळालेल्या माहीतीनुसार भाजीपाल्याचे कॅरेट भरलेले मालवाहू वाहन पलटी झाले. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसून वाहनातील भाजीपाल्याने भरलेले कॅरेटमधील भाजीपाला हे रस्त्यावर पडल्याने मोठे नुकसान झाले.अकोट कडून अंजनगाव सुर्जी येथे भाजीपाल्याचे कॅरेट घेवून महिंद्रा मालवाहू पीकअप क्रं.एम एच 27 बी एक्स 7725 हे येत असताना पलटी झाले. रस्त्याने मेंढपाळ हे मेंढ्या घेवून जात असताना त्यांनी पूर्ण रस्ता वेढून घेतला होता. मेंढ्यांना बाजूला करत असलेली बाई अचानक मालवाहू महिंद्रा पिकअप च्या मधात आल्याने बाईला वाचविण्याच्या प्रयत्नात हे वाहन रस्त्याच्या कडेला जावून पलटी झाले. वाहनातील भाजीपाल्याचे संपूर्ण कॅरेट हे वाहना खाली पडल्याने नुकसान झाल्याचे,वाहन चालक सुनील सैन यांनी सांगीतले. लगेच दुसऱ्या वाहनाला बोलवून भाजीपाला अंजनगाव येथील भाजी मार्केट मध्ये रवाना केले. यात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.मात्र वाहनाचे मोठे नुकसान झाले.

काही वर्षापुर्वी याच महामार्गावरील सावळी दातुरा येथे मेंढपाळांच्या शंभरच्या वर मेंढ्या ट्रकमध्ये फसुन मृत्युमुखी व कित्येक जखमी झाल्या होता. पर राज्यातील मेंढपाळांना गुरे स्थानीक जंगलात रानात चराईबंद असतानाही बर्याधच परराज्यातील मेंढपाळ राजरोसपणे महामार्गावरुन गुरं, मेंढ्या चारतात याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी नागरिक करताहेत.



# महिलेचा केला विनयभंग

**अमरावती** - परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संतोष नगर येथील फिर्यादी 38 वर्षीय महिला एका घरात स्वयंपाकाचे काम करत होती. यावेळी आरोपी नितेश किल्लेदार याने महिलेला वारंवार फोन करून चुकीच्या उद्देशाने तिच्याशी बोलला. विनयभंग केल्याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी नितेश किल्लेदारविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# महात्मा फुलेंना अभिवादन!




**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.3 )-** सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या 134 व्या जयंतीनिमित्त भाद्रकांता बहुद्देहशीय सामाजिक संस्था आकोटच्या वतीने स्थानिक बुद्धविहार प्रांगणात कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा सुनीता गवई यांनी महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की जीवनात कितीही संकट आले तरी संघर्ष सोडू नये खंबीरपणे त्याचा सामना करावा ज्याप्रमाणे महात्मा फुले यांचे संपूर्ण जीवन संघर्षमय होते, यातून त्यांनी समाजासाठी महान कार्य केले ते आपण आज पाहत आहोत असे सांगितले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी व नगरातील सन्माननीय नागरिक उपस्थित होते. मंचीय कार्यक्रमानंतर आंबेडकर नगर ते महात्मा फुले नगर अशी रॅली काढण्यात आली रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या कार्याविषयी आणि विचार दर्शविणारे फलक हातात घेऊन जयघोष करीत चालत होते. शेवटी मान्यवरांनी महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारीत माहिती दिली.

# पांढरघाटी येथे सातपुडा हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.3 )-** तालुक्यातील पांढरघाटी येथील स्व.वामनराव देशपांडे क्रीडा अकादमी व शाळा व्यवस्थापन समितीच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय सातपुडा हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन 7 डिसेंबरला सकाळी 10 वाजता केले आहे.



या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून या भागाचे नवनिर्वाचित आमदार चंदू यावलकर तर कार्यक्रमाध्यक्ष म्हणून माधवराव देशपांडे आर्किटेक नागपूर यांची उपस्थिती राहणार आहे. तर विशेष अतिथी म्हणून बेनोडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार ज्ञानोबा फड, प्रमुख अतिथी म्हणून स्त्री रोग तज्ञ डॉ.मनोहर आंडे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य श्रीधर सोलव, सामाजिक कार्यकर्ता निळकंठ मुरूमकर, खडक्याचे सरपंच राहुल फुले, पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे, सामाजिक कार्यकर्ता उत्तम शरेकर, ॲड.आशिष वानखडे, शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप बुरंगे, दशरथ गाडगे, शालेय पोषण आहाराचे अधीक्षक अनिल चहांदे, पत्रकार विलास पाटील, सुधाकर कुबडे, आर्किटेक रथीन देशपांडे, ग्रामपंचायतच्या सदस्या फुलाबाई सलामे यांची उपस्थिती राहणार आहे. मागील काही वर्षापासून स्व. वामनराव देशपांडे कला व क्रीडा अकादमी पांढरघाटी तसेच शाळा व्यवस्थापन समिती पांढरघाटी हे विविध उपक्रम राबवीत असतात त्याचाच एक भाग म्हणून नुकताच तालुकास्तरीय सातपुडा हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. सदर स्पर्धा ही शनिवार दिनांक 7 डिसेंबरला सकाळी 10 वाजता सुरू होईल. त्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांढरघाटी येथे विविध मान्यवराच्या उपस्थितीत कार्यक्रम घेऊन विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात येईल. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन स्वर्गीय वामनराव देशपांडे कला व क्रीडा अकादमी पांढरघाटीचे अध्यक्ष नामदेव सानप, मुख्याध्यापक सुधीर कांबळे, शाळा व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष जगदीश परतेती, सहाय्यक शिक्षक विजय घोरपडे, पोलीस पाटील विजय इडपाची यांनी केले आहे.

# ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांचे दुःखद निधन

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.3 )** - शहरातील नामवंत, कीर्तिवंत, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, व इतर क्षेत्रात, विविध चळवळीत सक्रिय असणारे ज्येष्ठ पत्रकार, दर्यापूर अखिल भारतीय पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष संजय कदम यांचे सोमवारी (2 डिसेंबर) रोजी रात्रीच्या वेळी हृदय विकार आजाराने दु:खद निधन झाले. ते 56 वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. कदम यांच्या अकाली निधनाने संपूर्ण कदम परिवारासह दर्यापूरातील पत्रकार, राजकीय नेते, हितचिंतकांना धक्का बसला आहे. संजय कदम यांच्या निधनाने पत्रकारितेची मोठी हानी झाली असून, नि:पक्षपाती, निर्भय आणि सचोटीवर आधारित पत्रकारिता ही त्यांची ओळख होती. अखेरच्या श्वासापर्यंत संजय कदम यांनी प्रामाणिक आणि समर्पित भावनेने लढाऊ पत्रकारिता केली. त्यांच्या निधनाबद्दल दर्यापूरातील चाहते मंडळी, पत्रकार, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकारण्यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. पत्रकारिता म्हणजे समाजाचा खरा आवाज आहे, या भूमिकेतून त्यांनी आयुष्यभर काम करत सत्य समोर आणण्यासाठी नेहमी निर्भयपणे काम केले. त्यांचा पत्रकारितेचा पण दांडगा अभ्यास असल्याने त्यांनी तरुण पिढीला पत्रकारिता कशी करावी या विषयी मार्गदर्शन करीत. वयाने जेष्ठ असले तरी लहान मुलापासून ते जेष्टमंडळी सोबत तेवढीच मैत्रीपूर्ण राहत होते. आपल्या शांत आणि संयमी पत्रकारितेने त्यांनी आपली विशेष ओळख निर्माण केली होती. दि. 3 डिसेंबर रोजी हिंदु स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी अनेकांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.



# कृषी सहायक अमोल चौकडे कृषीथॉन पुरस्काराने सन्मानित

## शेतकऱ्यांपर्यंत पोह्चविल्या शासकीय योजना



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.3 ) -** अनेक शासकीय कर्मचारी नियमाच्या बाहेर न जाता पारंपरिक पद्धतीने काम करतात. मात्र चांदूर रेल्वे तालुका कृषी कार्यालय अंतर्गत कृषी सहायक अमोल चौकडे यांनी शासकीय योजना व कृषी विषयक माहिती पारंपरिक पद्धती ऐवजी कार्टून व्हिडिओद्वारा मनोरंजक पद्धतीने गावं खेड्यांपर्यंत पोहचवित शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना नुकतेच नाशिक येथील भव्य कृषी प्रदर्षणी मध्ये कृषीथॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ह्यूमन सर्विस फाउंडेशन नाशिक द्वारे दरवर्षी राष्ट्रीय स्तरावरची कृषी प्रदर्शनीचे आयोजन करण्यात येते. यामध्ये कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येते. यावर्षी शासकीय गटातून अमोल चौकडे यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना कृषीथॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. चांदूर रेल्वे तालुक्यातील मांजरखेड (कसबा) येथील रहिवासी असलेले अमोल चौकडे हे चांदूर रेल्वे तालुक्यातील बोरी, किरजवळा, वाई, बोथ आणि खंबाळा या कार्यक्षेत्रात कृषी सहायक म्हणून कार्यरत आहे. स्वत: प्रयोगशील शेतकरी असल्याने केवळ कार्यक्षेत्र पुरते मर्यादित न राहता चांदूर रेल्वेसह धामणगाव, नांदगाव खंडेश्वर तालुका व अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांशी डिजिटली कनेक्ट आहे. ते सोयाबीन, हरभरा व तूर या पिकांमध्ये पारंपरिक पद्धतीपेक्षा सुधारित पट्टा पेर पेरणी पद्धती कशी फायदेशीर आहे हे प्रात्यक्षिक द्वारा शेतकऱ्यांना पटवून देतात. त्यामुळे चांदूर रेल्वे तालुक्यात व जिल्ह्यामध्ये सुधारित पट्टापेर पेरणीचे क्षेत्र वाढताना दिसत आहे. अमोल चौकडे यांच्या पुरस्कारबाबत तालुका कृषी अधिकारी श्री

ढाकरे, मंडळ कृषी अधिकारी आडे, मांजरखेडचे सरपंच पल्लवी शैलेश देशमुख, श्री पाताळेश्वर व गुप्तेश्वर देवस्थान अध्यक्ष नरेंद्रपंत देशमुख, दिलीप गुल्हाने, अमोल देशमुख, प्रसिद्ध उद्योजक प्रफुल्ल देशमुख, मुंसिफ पठाण, प्रा.डॉ. मेघराज मेश्राम, श्रीनाथ वानखडे आदींसह गावकऱ्यांनी त्यांच्या यशाबाबत अभिनंदनाचा वर्षाव केला.

### शेतकरी ते तज्ज्ञ मार्गदर्शक प्रवास

स्वत: अगोदर शेतकरी म्हणून प्रयोग करून बघायचा, नंतर यश आल्यावर इतरांना सांगायचे याच तत्वावर अमोल चौकडे यांनी आपल्या कामाची पद्धत अवलंबिली आहे. शेतकऱ्यांपासून ते ग्रामसेवक, तलाठी व ईतर ग्रामीण भागातील निगडित कर्मचारी व अधिकाऱ्यांना रामेती व ईतर प्रशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षकाच्या माध्यमातून मार्गदर्शन करतात.

### कार्टून फिल्मद्वारा जनजागृती

आजचे ग्रामीण भागातील युवक, शेतकरी हे मोबाईल वर व्हिडिओ रिल्स अधिक बघत असल्याने व्हिडिओ निर्मितीची कल्पना सुचली. कार्टून फिल्म मध्ये वहिनी, शंकर, मंग्या सारखे पात्र निर्माण करून मनोरंजक पद्धतीतून शेतकऱ्यांना बियाणे उगवण क्षमता, पट्टा पेर पेरणी, सोयाबीन, तुर , खोडमास अळी, जुनी पेरणी व नवीन पेरणी मधील फरक व फायदे व कृषी योजना आदी विषय त्यांनी गावं खेड्यातील भाषेतून पोहचविले. जवळपास दोन हजार पेक्षा अधिक शेतकऱ्यांपर्यंत केवळ व्हॉट्सअप ग्रुप द्वारा थेट संपर्कात असल्याचे अमोल चौकडे यांनी सांगितले.

# चुरणीमध्ये पाणी टंचाईचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

## गावात पंधरा ते विस दिवसापासून पाणीपुरवठा बंद

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.3 )-** चुरणी गावात आतापासूनच पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. कधी पाईपलाईन फुटने तर कधी लाईन नसने अशा अनेक कारणांनी चुरणी गावाला पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. ही पाणी टंचाईची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पंधरा ते विस दिवसांपासून पाणी पुरवठा झाला नाही, याकडे ग्रामपंचायतचे दुर्लक्ष झाले आहे. ग्रामपंचायतने टँकरने पाणीपुरवठा सुरु करावा अशी मागणी महिलांकडुन होत आहे.



मेळघाटातील अतिदुर्गम भागातील गावांत आतापासूनच पाणी टंचाईने डोके वर काढणे सुरू केले आहे. जंगलातील पाण्याची पातळी झपाट ?ाने खालवत जात असल्यामुळे येणाऱ्या उन्हाळ्यात डोंगरदऱ्यात पाण्याचे मोठे संकट उभे ठाकण्याची भीती व्यक्त होत आहे. सध्याच्या स्थितीत पाणी पुरवठा विभागाच्या विहिरीतील पाण्याची पातळी खालवत जाण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली असुन त्यावर आतापासूनच उपाययोजना आखणे गरजेचे आहे. पाणी पुरवठा विभागाच्या जुन्या विहिरीचे खोलीकरण, विहिरीच्या बाजुला सिंमेट बंधारे असे उपक्रम राबवून पाणी टंचाईवर मात केली जाऊ शकते. मेळघाटातील बहूतांश गावांच्या भाग मुरमाळ असल्यामुळे अशा जमिनीत पावसाचे पाणी कमी प्रमाणात झिरपते आणि अनेक भागात उन्हाळ्यात पाणी टंचाईचे संकट डोके वर काढते आणि जनतेला जंगलात पाण्यासाठी वणवण पायपीट करावी लागते. सध्या नदीनाल्यांतील पाण्याच्या प्रवाहावाची गती कमी होत चालल्यामुळे आणि काही नाल्याचे प्रवाह तुटले असल्यामुळे यंदा पाणी टंचाईचे मोठे सावट आतापासूनच दिसायला लागले आहे.

पाणी पुरवठा विभागाच्या सर्वच विहिरी नदीनाल्यांच्या काठावर असुन जवळपास सर्वच नाल्याचे खोलीकरण करण्यात आल्यामुळे हे पाणी तापी नदीतुन वाहून गेल्यामुळे यंदा पाणी या नदीनाल्यांत सध्याच्या स्थितीत उपलब्ध नाही. जंगलातील व्याघ्र प्रकल्पाच्या वनकायद्यांमुळे जंगलात पाणी अडविले जात नाही त्यामुळे जंगलात पाण्याची भीषण टंचाई जाणवणार असल्याची चिन्हे दिसत आहे. व्याघ्र प्रकल्पातुन वाहणाऱ्या नदीनाल्यावर एकही बंधारा बांधण्यात आला नसल्यामुळे जंगलातील गावात पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला असुन त्यामुळे जनतेचे यंदा उन्हाळ्यात मोठे हाल होणार आहे. पहाडातुन निघालेल्या नद्यानाले हे उतारावर असल्यामुळे या नद्यानाल्यांतील पाणी वाहून मध्यप्रदेशाच्या सिमेवर असलेल्या तापी खोर्याणतुन वाहून जात असल्यामुळे थेंब थेंब पाण्यासाठी वन्यजीव आणि जनता वणवन भंटकतीवर असल्याचे भयावह चित्र दरवर्षी मेळघाटाच्या जंगलात पहायला मिळत आहे.

### बंधारे बांधणे गरजेचे

जंगलात पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होत आहे त्यावर जंगलात पाण्याची पातळी वाढविण्यासाठी उपाययोजना करण्यात व्याघ्र प्रकल्पाचे नियम आडवे येत आहे. जमिनीत पाण्याची पातळी वाढविण्यासाठी तलाव व सिंमेट बंधारे बांधण्याचे काम सुरू केले पाहिजे. अशी मागणी होत आहे.